१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा कारागृह, धाराशिव यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती अथवा सद्यस्थिती (माहिती अर्जातील प्रथम विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.
२. अधिक्षक, जिल्हा कारागृह, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्तनुसार द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8124 दि. 18/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १२४३ व १४४२/२०२४,**
**बोर्ड क्र. २३, २४**

श्री.शैलेश मोहनलाल करवा, — अपिलार्थी
रा.बी.११/१४, दमाणी कॉम्प्लेक्स, लक्ष्मी मार्केट रोड, सोलापुर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, : उत्तरवादी क्र.१
पोलीस स्टेशन, तुळजापुर जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर
जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.३०.०६.२०२५ रोजीच्या लेखी निवेदनाद्वारे विचाराधिन द्वितीय अपीलाची सुनावणी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. त्यांची विनंती विचारात घेऊन सदर प्रकरणांची सुनावणी **गुगलमिट ॲपद्वारे ऑनलाईन पद्धतीने** आयोजित करण्यात आलेली आहे. सदर ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित आहेत. तसेच आज रोजीच्या सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.गजानन घाडगे, हे.कॉ. व श्री.जाधव बी.डी., हे.कॉ. हे आयोगाच्या कार्यालयात उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २३, २४ | दि.११.०९.२०२४ | Complaint of Shri B.R. Chanshetti, investigating officer, Tuljapur police station under section ३ of the Maharashatra civil services(coduct) rules १९७९ and section १० of Maharashtra act no.xxi of २००६ or relevant disciplinary rules for hugs corruption made by him and for delay of official duties by १४५ days despite fir १५४/२०२३ filled on १९.०४.२०२३ at Tuljapur police station. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती पोलीस स्टेशन, तुळजापुर चे अभिलेखावरती उपपलब्ध नाही, असे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१८.१२.२०२३ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार अपिलार्थी यांना त्याच दिवशी म्हणजेच दि.१८.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावीत.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांनी विचाराधिन दोन्ही द्वितीय अपीलामध्ये एकाच माहिती अर्जाद्वारे माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१८.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केलेला आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि.१८.१२.२०२३ रोजीच अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करून दाद मागणे संयुक्तीक ठरेल, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

उपरोक्त २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7482 दिनांक : 07/07/2025

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१६९१/२०२४
बोर्ड क्र.२५

श्री.बाळासाहेब वसंतराव सुभेदार, रा.छत्रपती कॉलनी, जाधववाडी रोड, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय,धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १२.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| पोलीस स्टेशन नळदुर्ग गु.र.नं.३४१/२०२३ मधील गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हयातील आरोपींनी सोशल मिडीयावर गुटखा तस्करीत नळदुर्ग पोलीसांचे हात गुंतलेले हा घ्या पुरावा नकुल पंडीत बरोबर कुणाचे संबंध? सीडीआर तपासा वगैरे बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये दि.१०.१०.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मोघमपणे नाकारलेली आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मागितलेली माहिती कलम ८(ज) ८(त्र), ८(छ) अन्वये नाकारलेली आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश तसेच अधिनियमातील तरतुदी विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8044 दि. 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४९३५/२०२४
बोर्ड क्र.२८

श्रीमती प्रियंका रमेश सोनटक्के, अपिलार्थी
रा.ए-०१-५०१, संपन्न होम्स शेवाळेवाडी नाका,
पुणे सोलापुर रोड, पुणे-४१२३०७

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, : उत्तरवादी क्र.१
पोलीस स्टेशन नळदुर्ग, ता.तुळजापुर जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| नळदुर्ग पोलीस स्टेशनमधील सर्व सी.सी.टी.व्ही.फुटेज मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निणय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8045 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६१३७/२०२४
बोर्ड क्र.२९

श्रीमती पंचक्षरी कृष्णा चव्हाण, — अपिलार्थी
रा.रुद्रवाडी पो.जेवळी तां.लोहारा जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव दि.१४.०२.२०२४ जा.क्र.२०२४/उपचिटणीस /एमएजी-४ कावी आमरण उपोषण प्राधान्य/तात्काळ या आदेशाप्रमाणे कार्यवाहीबाबत व इतर २ मुद्दयांबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.२६.०३.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसुचना दि.११.१०.२००५ नुसार केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २४(४) अन्वये सर्व पोलीस आयुक्तालयाच्या विशेष शाखा व सर्व जिल्हयातील सर्व जिल्हा पोलीस अधिक्षकांच्या जिल्हा विशेष शाखा यांना सदर अधिनियमातील तरतुदी लागु होणार नाहीत अशी तरतुद असल्याने माहिती पुरविणे शक्य होणार नाही, असे अपिलार्थी यांना कळविल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊंन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8046 दि. 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७७५०/२०२४
बोर्ड क्र.३०

श्री.शेख शौकत छोटुलाल, — अपिलार्थी
रा.तामलवाडी ता.तुळजापुर जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तामलवाडी, ता.तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मा.ए.एस.सय्यद, सहायक पोलीस निरीक्षक, तामळवाडी पोलीस स्टेशन यांनी तपास करून दि.१७.०६.२०१५ रोजी डॉ.शेख शौकत छोटुलाल यांच्या विरूद्धमध्ये तामळवाडी स्टेशनमध्ये कलम ३५४ ड १ प्रमाणे कुठल्या पुराव्यानुसार गुन्हा दाखल केला त्याची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०४.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे सदरी माहिती अभिलेखावर उपलब्ध नसुन सदरचे तपासाचे कागदपत्रे हे न्यायालयात दि.१३.०६.२०१५ रोजी दोनं२३/२०१५ नुसार मा.कोर्टात दाखल केले असुन सदर गुन्हा हा कोर्टाच्या अधिन असुन सदर माहिती मा.न्यायालयातुन घेण्यात यावी, असे कळविल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१६.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात सर्व बाबी विचारात घेता,

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8047 दि. 14/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८१३७/२०२४
बोर्ड क्र.३१

श्री.बापु विठ्ठल कदम, — अपिलार्थी
मु.पो.गोजवडा ता.वाशी जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वाशी, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सुभाष काथीनाथ तांबडे बक्कल नं.५३३ यांची वाशी पोलीस स्टेशनला नियुक्ती कधी झाली व त्या कालावधीत त्यांना किती केसेस दिल्या बाबत व इतर २ मुद्दयांची माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१३.०४.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना मुद्देसुद माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8048 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.९५३५/२०२४
बोर्ड क्र.३२

श्री.इकबाल मुबारक शेख,
रा.नवीन तहसिल कार्यालयासमोर, परंडा जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन परंडा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी, भूम जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ.छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| परंडा पोलीस स्टेशन मधील दि.२२.०६.२०२४ रोजीच्या सकाळी १० ते सायं.९.०० यावेळीचे सीसीटीव्ही फुटेजबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना व्यक्तीश: माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्याबाबत पोच आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8049 दि. 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.९६०९/२०२४
बोर्ड क्र.३३

| | | |
|---|---|---|
| | श्री.ब्रम्हदेव वासुदेव गावडे, रा.प्लॉट नं.४५, परिजात नगर, एन-०४, छत्रपती संभाजीनगर | अपिलार्थी |
| | विरुध्द | |
| १ | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वाशी जि.धाराशिव | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, भुम जि.धाराशिव | : उत्तरवादी क्र.२ |

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| माहे एप्रिल २०२४ मध्ये पो.स्टे.भुम आवारामध्ये झालेल्या अपघाताबाबत एकुण ६ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणविषयी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती दि.०३.०७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांना पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार दि.०५.०९.२०२४ रोजी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान आयोगासमोर झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनामहिती अधिकारी यांनी दि.०३.०७.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलय अधिकारी यांनी दि.०८.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली सि.सि.टि.व्ही. फुटेजची सॉफ्ट कॉपी पुरविण्यात यावी, असे जन माहिती अधिकारी यांन आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपील आदेशानुसार

जन माहिती अधिकारी यांनी दि.५.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8050 दि. 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१०३९४/२०२४
बोर्ड क्र.३४

श्री.विनोद रामेश्वर हरभंरे, — अपिलार्थी
रा.उपळाई ता.कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, भुम जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेवतीने देखील जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| पोलीस स्टेशन कळंब मधील सर्व परिसर व इमारतीमधील दि.१५.०७.२०२४ रोजी सकाळी ७ वा. ते दि.१५.०७.२०२४ रोजी ११ वाजता या दरम्यानचे सि.सी.टी.व्ही फुटेज व दि.१५.०७.२०२४ ते १६.०७.२०२४ या दोन दिवसांची स्टेशन डायरी. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालुला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.१६.१०.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती हि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(ज) अन्वये नाकारली असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१४.११.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8051 दि. 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१११२७/२०२४
बोर्ड क्र.३५

श्री.प्रेमकुमार सुखदेव बनसोड, — अपिलार्थी
शाहुनगर, काकडे प्लॉट, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, : उत्तरवादी क्र.१
पोलीस स्टेशन, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०७.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| धाराशिव पोलीस ठाणे येथील स्टेशन डायरीच्या नोंदी, लॉकअप डायरीच्या नोंदी, आवक जावक नोंदवही, सिसिटीव्ही फुटेजबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली माहिती हि माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८(१)(ज) अन्वये नाकारली असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१०.१०.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8052 दि. 15/07/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर -४३१००१

श्री.गोविंदसिंग भिमसिंग राजपुत, : अपिलार्थी
रा.ऑल जर्नालिस्ट ॲंड फ्रेंड सर्कल, महाराणा फंक्शन हॉल,
कोर्टाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव

विरुध्द

| बोर्ड क्र. | द्वितीय अपील क्र. | जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा तपशिल | |
|---|---|---|---|
| ३६ व ३७ | ९८८ व ९८९/२०२४ | जन माहिती अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ३६ व ३९ | ९९० व ९९१/२०२४ | जन.माहिती अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, भुम जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ४० व ४१ | ९९२ व ९९३/२०२४ | जन माहिती अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |
| ४२ व ४३ | ९९४ व ९९५/२०२४ | जन माहिती अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय, उमरगा जि.धाराशिव<br>प्रथम अपिलीय अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय, धाराशिव | उत्तरवादी क्र.१<br>उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

### निर्णय

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, विचाराधिन द्वितीय अपीलातील सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती मला जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली असुन सदर माहितीने माझे पुर्णत: समाधान झालेले आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावीत.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपीले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

उपरोक्त ८ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र. 7483 दि. 07/02/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - १३१६ व १३१३/२०२४**
**बोर्ड क्र.४४, ४५ एकुण २ अपीले**

श्री.राकेश रामकिशन कोमटवार, — अपिलार्थी
रा.गांधीनगर, कळंब, ता.कळंब जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ४४ | २४.११.२०२३ | दि.०१.०९.२०२३ ते ०१.११२०२३ पर्यंतचे कार्यालयातील सिसिटीव्ही फुटेजबाबत. |
| ४५ | २४.११.२०२३ | विश्व लंचहोम बीअरबार ॲन्ड परमीटरूम एफ एल III लासन क्र.२०/२०२३ दि.१८.१०.२०२३ रोजी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात एकुण ८ मुद्याद्वारे माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर असे कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाद्वारे आवश्यक असलेली माहिती दि.१५.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपीले निकाली काढण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.१५.१२.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता,

विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7603 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१६५७/२०२४
बोर्ड क्र.४७

श्री.कैलास भिमा जाधव,
रा.घाटनांदुर ता.भुम जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
विभागीय कार्यालय, धाराशिव. — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
विभागीय कार्यालय, धाराशिव. — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१८ ते २०२५ या कालावधीतील भुम व परांडा तालुक्यातील सर्व कामाची MB व इस्टीमेट बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांनी आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती आज रोजी सोबत आनलेली असुन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे ती अपिलार्थी यांना उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निर्देशानुसार आयोगासमक्ष उपलब्ध करून दिलेली आहे व ती अपिलार्थी यांनी स्विकारलेली आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8053 दि. 15/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२०४२/२०२४
बोर्ड क्र.४८

श्री.रोहीदास रक्माजी चौधरी, — अपिलार्थी
मु.पो.विजय दादा बनसोडे निवास, रूई रोड, परांडा जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, परांडा जि. धाराशिव.

२ प्रथम अपिलीय अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, परांडा जि. धाराशिव.

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| बळी किसना कांबळे रा.भाडेगांव ता.परांडा यांचे १६.०३.१९९२ पासुनचे शेतातील विद्युत मोटरीचे लाईटबील बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8054 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७२४४/२०२४
बोर्ड क्र.४९

श्री.अनंत गुरूनाथराव कंदारे, — अपिलार्थी
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापुर जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महिला कामगार यांच्या पगार व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता मागणी केलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती, माहिती अधिकार २००५ चे अधिनियमाचे कलम २(च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे सदर माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8055 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.१०८२४/२०२४**
**बोर्ड क्र.५०**

श्री.बलभीम येडबा बर्वे, — अपिलार्थी
मु.पो.गडदेवधरी पो.सोनेगाव ता.जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
सहायक निबंधक सहकारी संस्था, कार्यालय धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
सहायक निबंधक सहकारी संस्था, कार्यालय धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२० ते २०२४ या कालावधीतील संस्थेच्या चालु वर्षाचे लेखा परिक्षणची नक्कल व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणीकरीता आयोगासमोर कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही एका पेक्षा अनेक विषयाशी निगडीत असल्याचे दिसुन येत आहे. मात्र महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील प्रथम विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, सहायक निबंधक सहकारी संस्था, कार्यालय धाराशिव यांनी वर नमुद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील प्रथम विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत, अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.
२. प्रथम अपिलीय अधिकारी यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्तनुसार द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8056 दि. 15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक -१०५८५,१०५८७ ते १०५८९/२०२४**
**बोर्ड क्र.५१ ते ५४ एकुण ४ अपीले**

श्री.विश्वास व्यंकटराव कापसे, — अपिलार्थी
मु.गौरगांव पो.देवधानोरा ता.कळंब जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत कार्यालय, गौरगाव ता.कळंब जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ५१ | १५.०८.२०२४ | सन २०२२-२०२३, २०२३-२०२४ मध्ये शौचालय मंजुर लाभार्थी यादीबाबत. |
| ५२ | १४.०८.२०२४ | १५अव्या वित्त आयोग MB, Estimate, पावती, सर्व बीले,झालेली कामे बाबत. |
| ५३ | १५.०८.२०२४ | सन २०२३-२४ मध्ये मंजुर घरकुल यादी व पुर्ण बांधकाम झालेल्या घराचा ८ अ सत्यप्रत. |
| ५४ | १४.०८.२०२४ | सन २०२२ ते २०२४ मधील मंजुर यादी, पैसे दिलेल्याची यादी, १५ व्या वित्त आयोगातुन झालेली सर्व कामे, MB, Estimate, पावती, सर्व बीले, मजुरांची यादी. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.३०.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन ०७

दिवसात विनामुल्य माहिती देणेबाबात जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गौरगांव ता.कळंब जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ४ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 7602 दिनांक : 09/7/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११०८५ ते ११०८६/२०२४**
**बोर्ड क्र.५५, ५६ एकुण २ अपीले**

श्री.भोरे स्वामीराव रामा, — अपिलार्थी
रा.नागुलगांव ता.कळंब जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत कार्यालय, नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ५५ | ०८.०८.२०२४ | जाने.२०२४ ते जुलै २०२४ मासिक सभेचे इतीवृत्त, उपस्थिती नोंदवही, ठरावांची प्रोसेडींग बुक. |
| ५६ | ०८.०८.२०२४ | जाने २०२३ ते जुलै २०२४ मधील मासिक सभा नोटीस रजिस्टरच्या प्रती बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन ०७ दिवसात विनामुल्य माहिती देणेबाबात जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 7604 दिनांक : 09/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक - ११०८७ व ११०८८/२०२४**
**बोर्ड क्र.५७, ५८ एकुण २ अपीले**

श्री.अमरसिंह विठ्ठलराव भोरे, — अपिलार्थी
रा.नागुलगांव ता.कळंब जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत कार्यालय, नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६(१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील थोडक्यात विषय |
|---|---|---|
| ५७ | ०८.०८.२०२४ | सन २०२० ते २०२४ मधील मंजुर प्रकल्प आराखडेबाबत. |
| ५८ | ०८.०८.२०२४ | जाने २०२३ ते जुलै २०२४ मधील ग्रामसभेचे इतीवृत्त, उपस्थिती नोंदवही, घेण्यात आलेले ठराव/ प्रोसिडींग बुकची प्रत बाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान युक्तीवाद व आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरुन, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन ०७ दिवसात अपिलार्थीस विनामुल्य माहिती देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि

सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे कलम ७(६) प्रमाणे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. विस्तार अधिकारी, पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह २ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 7605 दिनांक : 09/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.११०८९/२०२४
बोर्ड क्र.५९

श्री.श्रीराम बंकट खाडे, रा.नागुलगाव ता.कळंब जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय नागुलगांव, ता.कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| १५ वा वित्त आयोग, पाणिपुरवठा, ग्रामनिधी, MREGS च्या बँक खात्याचे पासबुक किंवा स्टेटमेंट |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करमन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना ०७ दिवसात माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय नागुलगांव, ता.कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय नागुलगांव, ता.कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) मधील

तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी, पंचायत समिती कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र.इं.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8096 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४२०२/२०२४, ६१०१/२०२४
बोर्ड क्र.६० व ६१

श्री.काझी अनिसोद्दीन खमरोद्दीन, अपिलार्थी
रा.खंडोबा मंदीराजवळ, चोंदे गल्ली, कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, डिकसळ, ता.कळंब जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळंब जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २६.०२.२०२४, १९.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| | |
|---|---|
| द्वितीय अपील क्र.४२०२/२०२४ - | मौजे डीकसळ येथील ग्रामसेवक श्री.के.डी.गव्हाणे यांचे सेवा बुकची माहिती. |
| द्वितीय अपील क्र.६१०१/२०२४ - | मौजे डिकसळ येथील सर्वे नं.१६५(४) १० मधील बांधकामाबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२१.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना ०७ दिवसात माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय डिकसळ, ता.कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय डिकसळ, ता.कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) मधील

तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी या कालावधीमध्ये खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी, पंचायत समिती कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8095 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.५९७९/२०२४**
**बोर्ड क्र.६२**

श्री.शिवराम गोविंद मदने, म.बोरी (मातोळा), ता.उमरगा जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, बोरी ता.उमरगा जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, उमरगा जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ३१.०३.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| बोरी ग्रामपंचायत १४ वा व १५ वा वित्त आयोग कामे, दलीत वस्ती कामे, बँक खाते, लेखापरिक्षण अहवाल इ.बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी आयोगासमोर सुनावणी करीता कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./8057 दि. 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७५८३/२०२४
बोर्ड क्र.६३

श्री.सुरेश पंढरी इंगळे, — अपिलार्थी
रा.कन्हेरी ता.वाशी जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत कार्यालय, कन्हेरी ता.वाशी जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, — : उत्तरवादी क्र.२
पंचायत समिती, वाशी जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे कन्हेरी ता.वाशी येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या सन २०२०-२१ च्या ऑडीट रिपोर्टची प्रत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कन्हेरी ता.वाशी जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कन्हेरी ता.वाशी जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) मधील तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५**

रोजी आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी, पंचायत समिती वाशी जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8094 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७६२०/२०२४
बोर्ड क्र.६४

श्री.सचिन युवराज सास्तुरे, अपिलार्थी
रा.कडदोरा पो.बलसुर ता.उमरगा जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा महिला व बाल प्रकल्प अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
पंचायत समिती, उमरगा जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी,
जिल्हा परिषद, उमरगा जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ११.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१५ पासुन ते माहिती मिळेपर्यंत मोजे.कडदोरा ता.उमरगा येथील अंगणवाडी लाभार्थी व इतरबाबत |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी आयोगासमोर सुनावणी करीता कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची माहिती मागितल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8058 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८३३९/२०२४
बोर्ड क्र.६५

श्री.निलकंठ शंकरराव मरोट,
मु.पो.पारा ता.वाशी जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, पारा, ता.वाशी जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, वाशी जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| श्री.मधुकर मनोहर राऊत व इतर पाच व्यक्तींनी स.नं.२७६ /ब २ च्या एन. ए. प्रक्रीयेबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता आयोगासमोर कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी त्यांच्या आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती अद्यापपर्यंत न मिळाल्याने, असे कारण नमुद केलेले आहे. अभिलेखावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२८.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना ०७ दिवसात माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पारा, ता.वाशी जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पारा, ता.वाशी जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) मधील तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५**

रोजी आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी, पंचायत समिती वाशी जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8093 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१०२१६/२०२४
बोर्ड क्र.६६

श्री.जगदाळे संदिप मांगु, अपिलार्थी
फ्लॅट नं.३०१, शिवबालाजी हाईट्स महालक्ष्मी नगर, नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, तुळजापुर जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था,
तुळजापुर जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| संस्था व्यवस्थापन समिती द्वारा शा.औ.प्र.संस्था, तुळजापुर जि.धाराशिव यांच्या अभिलेख्याबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, तुळजापुर जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, तुळजापुर जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) मधील तरतुदीनुसार

शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०१५ रोजी** आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. प्राचार्य, शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था, तुळजापुर जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8092 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७२४३/२०२४
बोर्ड क्र.६७

श्री.अनंत गुरूनाथ कंदारे, — अपिलार्थी
रा.एस.टी.कॉलनी, तुळजापुर जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, : उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उप अधिक्षक भुमि अभिलेख, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणीकरीता आयोगापुढे अपिलार्थी गैरहजर आहेत. आयोगापुढील झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज अवाचनीय असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याचा काहीही बोध होत नाही. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)
**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8125 दि. 18/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१११७/२०२४
बोर्ड क्र.६८

श्रीमती शोभा अनिल मडके, — अपिलार्थी
मु.पो.मोहा ता.कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख, कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १३.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे मोहा ता.कळंब येथील शेतजमीन सर्वे नं.२३ फाळणीबारा फेर फार क्र.७०६ या चुकीची अंमल दुरुस्ती, एकत्रीकरण योजनेतील दुरुस्ती प्रकरणे व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत नाही. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडुन कलम ७(१) चा भंग झाल्याचे दिसुन येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, कळंब जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहीत मुदतीत कार्यवाही न केल्यामुळे अधिनियमातील कलम ७(१) चा भंग झालेला आहे. त्यामुळे त्यांचेविरूद्ध अधिनियमातील कलम १९(८)(ग)

व २०(१) मधील तरतुदीनुसार शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच **दि.१५.०९.२०२५ रोजी** आयोगाकडे सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचेविरूद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतीम करण्यात येईल.

३. उप अधिक्षक भुमि अभिलेख, कळंब जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8091 दि. 15/07/2025 नोंदणीकृत टपालाद्वारे.

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६१३२/२०२४
बोर्ड क्र.६९

श्री.पंचाक्षरी कृष्णा चव्हाण, — अपिलार्थी
रा.रुद्रवाडी पो.जेवळी ता.लोहा जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १९.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जा.क्र.२०२४/उपचिटणीस /एमएजी-४ कावी-८९ आमरण उपोषणबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२३.०४.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. मात्र त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती न दिल्यामुळे असे कारण नमुद केलेले आहे. सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०४.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०५.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर आदेशाची अमंलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाचे अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

15/7/25

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8059 दि. 15/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६१९४/२०२४
बोर्ड क्र.७०

सौ.मनिषा पोपट माने, — अपिलार्थी
रा.६०८/०२/२१, समर्थ नगर, जिजामाता नगर जवळ तुळजापुर,
जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, — उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख, — उत्तरवादी क्र.२
कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| फेर फार न करणेबाबत दिलेल्या आक्षेप अर्जावरील कार्यवाहीबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि. ३०.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8060 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८१७१/२०२४
बोर्ड क्र.७१

श्री.भिकाजी भिवा दडे, — अपिलार्थी
रा.१४९, यामिनी नगर, विजापुर रोड, सोलापुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मु.पो.नान्नज तुळजापुर येथील स.नं.२८३ पो.हिस्सा क्र.१ ते १३ चे टिपण व नकाशेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि. ३०.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

अपिलार्थी यांनी असे अवगत केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती अद्यापपावेतो मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्याने ती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर माहिती मिळाली नसल्याबाबत आज रोजी अपिलार्थी यांनी आयोगास अवगत केलेले आहे

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती पुनश्चःआयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाचे अंमलबजावणीकरीतां प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8138 दि. 18/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.१०९२५/२०२४**
**बोर्ड क्र.७२**

श्री.महेश अनिल मडके, — अपिलार्थी
मु.पो.मोहा ता.कळंब जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, — उत्तरवादी क्र.१
उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय कळंब, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख — उत्तरवादी क्र.२
कार्यालय, कळंब, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले, त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| जमिन एकत्रीकरण योजना मौजे मोहा ता.कळंब येथील सर्व्हे नं.२३ फाळणीबारा अंमलदुरुस्तीबाबत एकुण ३ मुद्दयांची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती मिळाली नसल्याबाबत आयोगास अवगत केलेले आहे .

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय कळंब, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उप अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाचे अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8126 दि. 18/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

**द्वितीय अपील क्र.१०९१९/२०२४**
**बोर्ड क्र.७३**

श्री.सागर शाहाजी मते, — अपिलार्थी
मु.पो.मोहा ता.कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०९.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| कळंब-मोहा-येडशी या रस्त्याची मोहा गाव हद्दीतील संपुर्ण माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी योनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही. सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक माहितीपोटी शुल्काबाबत कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देता येणे शक्य झाले नाही. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२६.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन पारीत केलेल्या आदेशानुसार दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीकरीता शुल्काबाबत कळविल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहितीची पृष्ठ संख्या कमी असल्याने ती विनामुल्य टपालाद्वारे उपलब्ध करून देणेबाबत जन

माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले दिसुन येत आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8127 दि. 18/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.११०५३/२०२४
बोर्ड क्र.७४

श्री.पाटील राजीव दामोधर, — अपिलार्थी
हरीभाऊ नगर, कृपासदन रोड, लातुर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभग, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२२ ते आजपर्यंत धाराशिव जिल्हयातील जलजिवन योजनेतील कामांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरीता आयोगापुढे कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. मात्र, अपिलार्थी यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती अद्याप अप्राप्त, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8128 दि. 18/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.११०६०/२०२४
बोर्ड क्र.७५

श्री.पाटील राजीव दामोधर, — अपिलार्थी
हरीभाऊ नगर, कृपासदन रोड, लातुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, — : उत्तरवादी क्र.२
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २८.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०२२ ते आजपर्यंत धाराशिव जिल्हयातील सर्व शाखा अभियंता यांनी केलेल्या कामांबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती दि.१९.०९.२०२४ रोजी व्यक्तीशः उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. आवश्यक असलेली संपुर्ण माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांनी लेखी पोच दिलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०९.२०२४ रोजी व्यक्तीशः उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची आज रोजी संपुर्ण माहिती मिळाली आहे, अशी स्वाक्षरीत पोच दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./8129 दि. 18/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१०८००/२०२४
बोर्ड क्र.७६

श्री.चनबसप्पा तमणप्पा घोंगडे, — अपिलार्थी
रा.२०३, पुर्व मंगळवार, सोलापुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, कार्यालय लोहारा जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.११.२०१९ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२०.०८.२०१९ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेल्या माहितीचा कार्यालयातील अभिलेख्यात पाहणी केली असता सदर माहिती दिसुन येत नाही. त्यामुळे मागणी केलेली माहिती निरंक असल्याबाबत अपिलार्थी यांना दि.१९.१२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यामळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.१२.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे माहितीबाबत कळविल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 8130 दि. 18/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१३०२/२०२४
बोर्ड क्र.७७

श्री.अश्रुबा धोंडीबा गाडे, — अपिलार्थी
मु.गंभीरवाडी ता.कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, — : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब जि.उस्मानाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अभियंता, — : उत्तरवादी क्र.२
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब जि.उस्मानाबाद

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ३१.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| गाव नकाशात नमुद मौ.गंभीरवाडी ते भोगजी गाव जोडणी रस्त्याबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांनी दि.३१.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, कळंब यांचेकडे माहितीची मागणी केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जातील नमुद माहिती ही उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद(बां.), उपविभाग कळंब यांचेशी संबंधित असल्याने कलम ६(३) नुसार सदर माहिती अर्ज दि.१०.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे संबंधिताकडे वर्ग करून तसे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. त्यानुसार उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद(बां.), उपविभाग कळंब यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करून देणे अपेक्षीत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम उपविभाग कळंब यांनी दि.१२.०१.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दि.१०.११.२०२३ रोजी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी करीता आयोगापुढे अपिलार्थी अनुपस्थित आहे. मात्र त्यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती मिळालेली नाही, असे कारण नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम) उपविभाग कळंब जि.उस्मानाबाद यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम) उस्मानाबाद यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8131 दि. 18/07/2025
प्रतिलिपी- आवश्यक त्याकार्यवाहीकरीता,

१. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम) उस्मानाबाद
२. उप अभियंता, जिल्हा परिषद(बांधकाम) उपविभाग कळंब जि.उस्मानाबाद

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.९७७/२०२४
बोर्ड क्र.७९

श्री.सचिन विजयकुमार सर्जे, अपिलार्थी
रा.शाहु नगर, काकडे प्लॉट, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी क्र.२
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १४.०२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| शिवेंद्र कन्स्ट्रक्शन दरम्यान हॉट मिक्स प्लॅनेट चालु आहे का याचा परवाना नोंदणीकृत आणि मशिनरी चालु असल्याबाबत माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती प्रथम अपील आदेशानुसार दि.२६.०४.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे एकुण ९ पृष्ठांची माहिती टपालाद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन महिती अधिकारी यांनी दि.२६.०४.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8132 दि. 18/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.९३६८/२०२४
बोर्ड क्र.८०

श्री.संतोष मनोहर कोळपकर, — अपिलार्थी
रा.बेलापुर रोड, वार्ड क्र.०५ श्रीरामपुर
ता.श्रीरामपुर जि.अहमदनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, आस्थापना शाखा, : उत्तरवादी क्र.१
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी क्र.२
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १८.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| विभागीय कार्यालया अंतर्गत सन २०२३-२०२४ कालावधीत करण्यात आलेल्या कामांच्या कार्यारंभ आदेश व इतरबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि.३०.०७.२०२४ रोजी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांनी लेखी पोच दिलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.३०.०७.२०२४ रोजी उपलब्ध करून दिल्याबाबत तसेच सदर माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांनी लेखी पोच दिलेली दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 8133 दि. 18/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५५७/२०२४
बोर्ड क्र.८१

श्री.बजरंग आण्णा गोमकर, — अपिलार्थी
रा.घाटनांदुर ता.भुम जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी सा., — उत्तरवादी क्र.१
एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, भुम जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी — उत्तरवादी क्र.२
एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, भुम जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २५.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे घाटनांदुर कार्यालयाकडुन वाटप केला जाणारा माल गर्भवती महिला, किशोरी मुलींना प्रति कार्ड वाटप प्रमाण, माल टेस्ट रिपोर्ट, भुम तालुक्यातील किशोर मुलींची व गर्भवती महिलांची यादी. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे विस्तृत स्वरूपाची माहिती मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केलेला नसल्याने त्यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असुन आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना ती उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकुण ४ मुद्यापैकी केवळ मुद्दा क्र.१ ची माहिती अपिलार्थी यांना देय होते. मुद्दा क्र.२ ते ४ ची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने सदर माहिती अपिलार्थी यांना कलम ८(१)(त्र) अन्वये देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी-सा. एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, भुम जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **केवळ मुद्दा क्र.१** ची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, भुम जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणी करीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8134 दि. 18/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२५०६/२०२४
बोर्ड क्र.८२

श्री.योगेश बळीराम कानडे, — अपिलार्थी
रा.काकंब्रा ता.तुळजापुर जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना कार्यालय, तुळजापुर जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.११.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| तुळजापुर तालुक्यातील एकात्मीक बाल विकास सेवा योजना अंतर्गत काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रांवरून, आज रोजी आयोगासमोर सुनावणी करीता कुणीही उपस्थित नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8135 दि. 18/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.४३६१/२०२४
बोर्ड क्र.८४

श्री.वलीउल्ला बरकतुल्ला सयद,
मु.पो.बेंबळी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी,
महाराष्ट्र वक्फ बोर्ड, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र वक्फ बोर्ड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १६.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| मौजे बेंबळी, ता.जि.उस्मानाबाद येथील वक्फ संस्था दर्गा हजरत जिंदालाल, लाल शहाबाद कब्रस्थान व मस्जि दि या नावाने नोंदणी केलेल्या कमिटीच्या नोंदणीप्रमाणपत्र व इतर ४ मुद्याबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिली किंवा कसे याचा उपलब्ध अभिलेख्याची पाहणी केली असता बोध होत नाही. तथापी अपिलार्थी यांना दि.०२.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी अनुपस्थित आहे. त्यामुळे त्यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा बोध होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडील दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये माहिती दिली नाही, असे कारण नमुद केलेले आहे. आज रोजी सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती दि.०२.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविल्याबाबत आयोगास अवगत केलेले आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 8597 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६४५/२०२४
बोर्ड क्र.८५

श्री.नरेशकुमार स्वरूपचंद जैन, — अपिलार्थी
रा.सदस्य विष्वासु प्रवासी संघटना, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामार्ग, गोंदीया आगार, मु.पो.देवरी ता.देवरी जि.गोंदीया

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| श्रीमती चेतना खिरवाडकर विभाग नियंत्रक रा.प.धाराशिव यांचे नियुक्ती आदेशप्रत व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असुन अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसुन येत नाही. आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, काहिही नमुद केलेले नाही. यासर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(सही)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./8598 दि. 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१५६१/२०२४
बोर्ड क्र.८६

श्री.नरेशकुमार स्वरूपचंद जैन, — अपिलार्थी
सदस्य वियवासु प्रवासी संघटना,
म.रा.मार्ग परि.महा.गोंदीया आगार, मुपो.ता.देवरी जि.गोंदीया

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव — उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| रा.प.च्या धाराशिव विभागात कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी तांत्रीक मेकेनिकल वाहतुक यांच्याकडे असलेल्या जडवाहन चालविण्याच्या परवान्याची प्रत व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक स्वरूपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र./ 8599 दि. 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५४७५/२०२४
बोर्ड क्र.८७

श्री.व्यंकटराव तुळशीराम वाघमारे,
रा.गोंविदनगर, सोमनाथपुर रोड, उद्‌गीर जि.लातुर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता.उमरगा जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता.उमरगा जि.धाराशिव : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २१.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| तक्रार अर्ज दि.१४.०८.२०२३ अन्वये केलेल्या कार्यवाहीच्या प्रती व इतरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरीता आयोगापुढे कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याबाबत काहीही बोध होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना द्वितीय अपील प्रयोजनामध्ये अद्याप कसलीच माहिती नाही, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे त्यांच्या तक्रार अर्जावरील चौकशी प्रकीयेबाबतची माहिती मागितलेली दिसुन येत आहे. प्रस्तुत प्रकरणात, कलम ८(१)(ज) अन्वये चौकशी होऊन निर्णय प्रक्रीया अंतिम झाला असल्यास अशी संपुर्ण माहिती, अन्यथा तक्रार अर्जाची सद्यस्थिती अपिलार्थी यांना देय ठरते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता.उमरगा जि.धाराशिव यांनी वर नमुदप्रमाणे अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (तक्रारींवरील चौकशी होऊन निर्णय प्रक्रीया अंतिम झाली असल्यास अशी संपुर्ण माहिती अन्यथा तक्रार अर्जाची सद्यस्थिती )आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. प्राचार्य, माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम, ता.उमरगा जि.धाराशिव यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8600 दि. 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८५३८/२०२४
बोर्ड क्र.८८

श्री.सलीम महमुद शेख, — अपिलार्थी
रा.वडनेर पो.खासगांव ता.परंडा जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा जात पडताळणी समिती, धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त, जिल्हा जात पडताळणी समिती, धाराशिव : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २७.०५.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| परांडा तालुक्यातील मुस्लीम जुलार जातीचे कार्यालयाकडुन जाने.२०२२ ते आजपर्यंत झालेल्या मंजुर जातपडताळणी प्रस्तावाबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरूपाची असुन ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. अशी माहिती एकत्रीत करण्याकरीता सार्वजनीक प्राधिकरणाकडील मणुष्यबळ व साधनसामग्री मोठया प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब कलम ७(९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भुमिका व उद्दीष्ट सफल होत नाही. त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर कलम ७(७) व कलम ११(१) नुसार त्रयस्थ पक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे हि बाब नैसर्गीक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. यानंतर माहिती प्रगट करणे व्यापक जन हितच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसुन येत नाही. आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अपूर्ण दिल्यामुळे, असे मोघमपणे नमुद केलेले आहे. यासर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8601 दि. 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१०५३/२०२४
बोर्ड क्र.८९

श्री.विकास जगन बनसोडे, — अपिलार्थी
रा.अंजिठा नगर, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| उपहारगृहाच्या ई-निविदे संदर्भात. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत उपलब्ध करून दिलेली नाही. त्यामुळे सदर माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.
२. प्रथम अपिलीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8602 दि. 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२१५७/२०२४
बोर्ड क्र.९०

श्री.संदीप चतुर्भुज सुतार, — अपिलार्थी
B-४, लक्ष्मीबाई जगदाळे हौसिंग सोसायटी फुले प्लॉट बार्शी,
ता.बार्शी जि.सोलापुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, — उत्तरवादी क्र.१
जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा रूग्णालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा शल्य चिकीत्सक, — उत्तरवादी क्र.२
जिल्हा शल्य चिकीत्सक जिल्हा रूग्णालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०३.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| डायलेसीस करण्यात आलेल्स रूग्णांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असुन अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही. याप्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसुन येत नाही. आज रोजी सुनावणीकरीता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती अपूर्ण दिल्यामुळे, असे मोघमपणे नमुद केलेले आहे. यासर्व बाबी विचारात घेता, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रिशाइं २१०८२०२५

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8603 दि. 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.२१९४/२०२४
बोर्ड क्र.९१

श्री.प्रदिप अंकुशराव वायसे, — अपिलार्थी
मु.आढाळा ता.कळंब जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कळंब जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २६.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| कांदा चाळ मोक्का तपासणी ची झेरॉक्सप्रत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती दि.२७.०२.२०२४ रोजी प्रथम अपील सुनावणी दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांनी लेखी पोच दिलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दि.२७.०२.२०२४ रोजी माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. सदर पत्रावर अपिलार्थी यांची स्वाक्षरीत पोच दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जावक क्र./ 8604 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.५८११/२०२४
बोर्ड क्र.९२

श्री.चौधरी रोहीदास रक्माजी, — अपिलार्थी
द्वारा विजय बनसोडे निवास, रूई रोड परंडा जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, : उत्तरवादी क्र.१
महाराष्ट्र विज वितरण कंपनी, परंडा जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, : उत्तरवादी क्र.२
महाराष्ट्र विज वितरण कंपनी, परंडा जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| बळी किसना कांबळे रा.भाडेगांव ता.परांडा यांचे १६.०३.१९९२ पासुनचे शेतातील विद्युत मोटारीच्या बिलांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आयोगापुढील उपलब्ध कागदपत्रावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल द्वितीय अपील प्रयोजनामध्ये मागितलेली माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती प्रकट केल्याने त्रयस्थाच्या खाजगी बाबीमध्ये आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८(१)(त्र)नुसार अपिलार्थीस देय होत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./8605 दि. 22/07/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७९०७/२०२४
बोर्ड क्र.९३

श्री.बाळासाहेब दिगंबर होरे, — अपिलार्थी
मु.पो.श्रीपुर ता.माळशिरस जि.सोलापुर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, — उत्तरवादी क्र.१
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परांडा जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, — उत्तरवादी क्र.२
परांडा जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २१.०३.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| पिक विम्या संदर्भात. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२७.०६.२०२४ रोजीचे प्रथम अपील आदेश पारीत केल्याचे दिसुन येत आहे. सदर आदेशात, जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने विमा कंपनीकडुन माहिती प्राप्त करून घेऊन माहिती १५ दिवसात अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाद्वारे कळविण्यात यावे. शासन निर्णय दि.१५.०६.२०२३ पासुन पी.एम.किसान योजनेची विभागनिहाय कार्यपद्धती निश्चित केली आहे. तत्पूर्वी सदर योजना महसुल विभागाकडे अंमलबजावणी असल्याने पी.एम.किसान योजनेअंतर्गत माहिती देणेकरीता महसुल विभागास जन माहिती अधिकारी

यांनी कळवावे, असे आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे उपलब्ध कागदपत्रावरून दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परांडा जि.धाराशिव यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत प्रथम अपील आदेशानुसार कार्यवाही करून अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परांडा जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलअजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8606 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.९३३३/२०२४
बोर्ड क्र.९४

श्री.गणेश बाबासाहेब भगत, — अपिलार्थी
रा.रामबाग रेसीडेन्सी, जुना कौठा ता.जि.नांदेड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कार्यालय धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कार्यालय धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी , जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक १२.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| द महात्मा फुले मल्टी सर्व्हीसेस संस्थेचे सन २०२१ ते मार्च २०२४ पर्यंत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन, बँकस्टेटमेंट, PEF चलन इ.बाबत |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरीता आयोगासमोर कुणीही उपस्थित नाही. त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती मिळाली किंवा कसे याचा कोणताही बोध होत नाही. अभिलेखावरून दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो उपलब्ध करून दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कार्यालय धाराशिव यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8607 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र. १११५/२०२४
बोर्ड क्र. ९५

| | |
|---|---|
| श्री.डॉ.गोपाळराव बाबुराव सोंडगे, रा.लक्ष्मी कुंज, बिंदुसरा कॉलनी-प, राजिव गांधी चौक, कॅनॉल रोड, बीड | अपिलार्थी |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट, बीड | : उत्तरवादी क्र.१ |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपकुलसचिव(शैक्षणीक विभाग), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर | : उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे विधीज्ञ, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०२.०८.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| विज्ञान शाखा व त्याशाखेतील सहायक प्राध्यापक व कर्मचा-यांची एकुण ३ मुद्यांद्वारे माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा शैक्षणीक विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे सादर केलेला दिसुन येत आहे. सदर माहिती अर्जातील माहिती ही महाविद्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अर्ज दि.२८.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कलम ६(३) नुसार जन माहिती अधिकारी, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट, बीड यांचेकडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.१८.१०.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8061 दि. 15/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.१९३९/२०२४
बोर्ड क्र.९६

श्री.डॉ.गोपाळराव बाबुराव सोंडगे, — अपिलार्थी
रा.लक्ष्मीकुंज बिंदुसरा कॉलनी-प,
राजिव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक-उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे विधीज्ञ, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०८.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| सन २०१६ ते २०२३ या कालावधीत श्री.बंकटस्वामी तहाविद्यालय, बीड या अनुदानीत महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्यानी सादर केलेल्या बायोमॅट्रीक मशिनच्या अहवालाबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेला दिसुन येत आहे. सदर माहिती अर्जातील माहिती ही महाविद्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कलम ६(३) नुसार सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट, बीड यांचेकडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.१०.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१८.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन पारीत केलेल्या प्रथम अपील आदेशानुसार पुनश्च दि.१८.०१.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे एकुण ३३६ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./8062 दि.15/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र. ४५६८/२०२४
बोर्ड क्र. ९७

श्री.डॉ.गोपाळराव बाबुराव सोंडगे, अपिलार्थी
रा.लक्ष्मी कुंज, बिंदुसरा कॉलनी-प, राजिव गांधी चौक,
कॅनॉल रोड, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, : उत्तरवादी क्र.१
खडकी घाट, ता.जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपकुलसचिव(शैक्षणीक विभाग),
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे विधीज्ञ जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०५.१२.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्थ्सस, बीडचे पत्र क्र.एस.बी.एस एस/२०२२-२३/१६२-१६३, दि.१८.०१.२०२३ बिंदुनामावली नोंदवहीची प्राथमिक तपासणीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रावरून, अपिलार्थी यांनी माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, विशेष कक्ष, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्याकडे सादर केलेला दिसुन येत आहे. सदर माहिती अर्जातील माहिती ही महाविद्यालयाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती अर्ज दि.११.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कलम ६(३) नुसार जन माहिती अधिकारी, श्री.बंकटस्वामी शिक्षण संस्था, खडकी घाट, ता.जि.बीड यांचेकडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.१२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8608 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.७०४९/२०२४
बोर्ड क्र.९८

श्रीमती रहेमत बेगम अजमत उल्लाह खान, — अपिलार्थी
रा.हत्तीखाना शिंदे जुनी बिल्डींग जुना बाजार, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, बलभीम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, बलभीम कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बीड : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २४.०२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| महाविद्यालयातील विद्यार्थीनी श्रीमती सयद फहमिदा बेगम सयद अब्दुल जब्बारहया विदयार्थिनीचे प्रवेश अर्ज व अर्जासोबत जोडलेल्या इतर सर्व कागदपत्रांबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०३.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे मागणी केलेली त्रयस्थ पक्षाची वैयक्तीक स्वरूपाची माहिती असल्याने सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ अन्वये नाकारलेली आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१२.०४.२०२४ रोजी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्रयस्थांची व्यक्तीगत स्वरूपाची माहिती असल्याने नाकारलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागितलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पारीत केलेले प्रथम अपील आदेश विचारात घेता सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8609 दि. 22/07/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.६०७/२०२४
बोर्ड क्र.९९

श्रीमती इमरान खय्युम खॉन पठाण, — अपिलार्थी
रा.बिलाल मोहल्ला, माजलगांव जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २३.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| माजलगांव बस स्थानक मधील कंपाउंड आत लावत असलेल्या खाजगी लोकांच्या बॅनरबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.११.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे माहिती पोटी शुल्काबाबत कळवुन दि.१३.१२.२०२३ अन्वये शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२१.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि.२१.१२.२०२३ रोजीचे प्रथम अपील आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8610 दि.22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८९४२/२०२४
बोर्ड क्र.१००

श्री.वैजनाथ नारायण देशमुख, — अपिलार्थी
रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक, : उत्तरवादी क्र.१
जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय, बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, : उत्तरवादी क्र.२
जिल्हा हिवताप कार्यालय, बीड

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २९.०४.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| दि.२६.०३.२०२४ रोजी करण्यात आलेल्या अर्जावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाही व इतर बाबत. |

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.०५.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या दाखल प्रथम अपीलावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०९.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करून प्रथम अपील निकाली काढलेले आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, सदर प्रथम अपील आदेशात बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि.०९.०७.२०२४ रोजीचे प्रथम अपील आदेश कायम ठेवण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8611 दि. 22/07/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.८४९६/२०२४
बोर्ड क्र.१०१ व १०२

श्री.सखाराम लक्ष्मण जाधव, — अपिलार्थी
रा. चेआमन वसंतराव नाईक मत्स्यव्यवसाय संस्था,
घाटंब्री, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, लघु पाटबंधारे विभाग, — उत्तरवादी क्र.१
जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी, — उत्तरवादी क्र.२
जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे विभाग, धाराशिव

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी ,जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.०७.२०२४ रोजीच्या २ माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| द्वितीय अपील क्र.८४९६/२०२४ - वसंतराव नाईक मत्स्य व्यवसाय संस्थेला काळया यादीत घातलेल्या आदेशाची प्रत. |
| द्वितीय अपील क्र.८४९८/२०२४- काळया यादीत घालणेबाबत शासननिर्णय. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करून दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०५.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे संचिकेच्या एकुण ५९ पृष्ठांची माहिती उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०८.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करून दिल्याचे दिसुन येत आहे. हि बाब विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./ 8612 दि. 22/07/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर-४३१००१

द्वितीय अपील क्र.११२०/२०२४ ते ११२३/२०२४
बोर्ड क्र.१०३ ते १०६

श्रीमती छाया शंकरराव कुहीरे, — अपिलार्थी
मु.पो.यशवंतनगर, शिवछाया निवास विठ्ठल रूक्मीणी मंदीराजवळ,
अंबड रोड, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, — उत्तरवादी क्र.१
उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, — उत्तरवादी क्र.२
उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना

(सुनावणी दिनांक ०२.०७.२०२५)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दिनांक २०.०९.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| |
|---|
| **द्वितीय अपील क्र.११२०/२०२४** - शासनस्तरावर दि.३०.११.२०२२ रोजी मंजुर झालेले परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदानाबाबत. |
| **द्वितीय अपील क्र.११२१/२०२४** - दि.२२.०३.२०२२ पासुन ते ३१.०७.२०३ पर्यंत कार्यालय प्रमुखास मी केलेले सर्व विनंती अर्ज व तक्रार अर्ज यांवर कार्यालयप्रमुखांनी प्रति उत्तरादाखल दिलेल्या पत्रांची सत्यप्रत. |
| **द्वितीय अपील क्र.११२२/२०२४** - दि.१०.०८.२०२२ रोजी टपालाद्वारे कोषागार कार्यल्याने रजारोखीकरण देयक आक्षेपीत केल्याचे कारण व नोंदवलेली टिप्पणी ची प्रत व इतर २ मुद्यांबाबत. |
| **द्वितीय अपील क्र.११२३/२०२४** - दि.०६.०९.२०२२ रोजी झालेल्या ३ सुनावणी निकालाच्या प्रतीबाबत. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणी दरम्यान झालेला युक्तीवाद व उपलब्ध कागदपत्रांवरून, अपिलार्थी यांच्या दाखल ४ प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.१२.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना

०७ दिवसात माहिती उपलब्ध करून देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केल्याचे दिसुन येत आहे. तथापि सदर आदेशाची अंमलबजावणी झाल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांनी अपिलार्थी यांना जोडपत्र अ नुसार आवश्यक असलेली व कार्यालयाकडे उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत कलम ७(६) नुसार नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह ४ द्वितीय अपीले निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./ 8613 दि. 22/07/2025